# डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 7.10.2017, दिनांक 22.02.2018, दिनांक 11.7.2019 |
| 3 | योजनेचा स्वरूप | उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान- विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देय आहे. |
| 4 | योजनेचा उद्देश | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांना लागू राहील. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेस पात्र विद्यार्थी सदर योजनेसाठीही अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>२. विद्यार्थ्याने शासकीय / निमशासकीय / खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्याने त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>३. तसेच खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वत:ची राहण्याची सोय केली असल्यास अशा विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटराईज्ड भाडे कराराची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>४. एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील / शहरातील संस्थेमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.<br>५. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यत मर्यादित आहे.<br>६. एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र आहे.<br>७. विद्यार्थ्यानी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच निर्वाहभत्ता देण्यात येतो. तथापि एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अथवा काही कारणांमुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश न मिळाल्यास त्यास त्या वर्षापुरता निर्वाह भत्ता लाभ अनुज्ञेय नाही.<br>८. या योजनेअंतर्गत रुपये 1.00 लाखपर्यत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्याकरीता निर्वाहभत्त्याचा लाभ देण्याकरीता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये 1.00 लाख ते रुपये 8.00 लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्हयासाठी लाभार्थी विद्यार्थ्याची कमाल संख्या 500 इतकी निश्चित करण्यात येत आहे. त्यापैकी 33 टक्के इतक्या जागा विद्यार्थिनीकरीता राखीव ठेवण्यात येतात. तथापि पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्हयातील विद्यार्थ्याकरीता उपयोगात आणता येतात.<br>९. प्रत्येक जिल्हयातील कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार प्रमाणशीररित्या (Proportionate) निश्चित करण्यात येतो. |

<table>
<tr><td>7</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. पालकांचे अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर असलेबाबतचे प्रमाणपत्र किंवा शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. CAP संबंधित कागदपत्रे. (केवळ विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम)<br>४. गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास)<br>५. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र.</td></tr>
<tr><td>8</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रकार</th><th>कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा</th><th>वसतिगृह ठिकाण</th><th>अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्याची रक्कम</th><th>प्रत्येक जिल्ह्यासाठीचा संच</th></tr>
<tr><td colspan="6">व्यावसायिक अभ्यासक्रम</td></tr>
<tr><td rowspan="2">01</td><td rowspan="2">ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत.</td><td rowspan="2">निरंक</td><td>मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ.</td><td>रु. 30,000/-</td><td rowspan="2">अमर्याद</td></tr>
<tr><td>इतर शहरे / ग्रामीण भागासाठी</td><td>रु. 20,000/-</td></tr>
<tr><td rowspan="2">02</td><td rowspan="2">इतर विद्यार्थ्यांसाठी</td><td rowspan="2">रु. 1.00 लाखापर्यंत</td><td>मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ.</td><td>रु. 10,000/-</td><td rowspan="2">अमर्याद</td></tr>
<tr><td>इतर शहरे / ग्रामीण भागासाठी</td><td>रु. 8,000/-</td></tr>
<tr><td rowspan="2">03</td><td rowspan="2">इतर विद्यार्थ्यांसाठी</td><td rowspan="2">रु. 1.00 लाख ते रु. 8.00 लाख</td><td>मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ.</td><td>रु. 10,000/-</td><td rowspan="2">500</td></tr>
<tr><td>इतर शहरे / ग्रामीण भागासाठी</td><td>रु. 8,000/-</td></tr>
<tr><td colspan="6">बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम</td></tr>
<tr><td>04</td><td>विद्यार्थी</td><td>रु. 1.00 लाखापर्यंत</td><td>-</td><td>रु. 2,000/-</td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>9</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>10</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.mahadbtmahait.gov.in</td></tr>
</table>